## प्रज्ञानंदची अनिश गिरीशी गाठ

**नवी दिल्ली :** दोम्माराजू गुकेशविरुद्ध जागतिक अजिंक्यपद लढत कोण खेळणार हे ठरविणाऱ्या 'कँडिडेट्स' (आव्हानवीर) स्पर्धेच्या पहिल्या फेरीत भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदसमोर नेदरलँड्सच्या अनिश गिरीचे आव्हान असणार आहे. पुरुष गटात प्रज्ञानंद हा एकमेव भारतीय खेळाडू आहे.

सायप्रसमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत कोनेरू हम्पीने माघार घेतल्याने महिला गटात भारताची विश्वचषक विजेती दिव्या देशमुख आणि आर. वैशाली आव्हान उपस्थित करतील. दिव्यासमोर पहिल्या फेरीत हम्पीची बदली खेळाडू म्हणून आलेल्या युक्रेनच्या ॲना मुझिचुकचे आव्हान असेल. तर, आर. वैशाली कझाकस्तानच्या बिबिसारा असाउबायेवाचा सामना करेल. महिला गटातील विजेती खेळाडू जू वेन्जूनपुढे जगज्जेतेपदासाठी आव्हान उपस्थित करेल.

### पहिल्या फेरीच्या लढती

- **(पुरुष) :** जावोखिर सिंदारोव वि. आंद्रे एसिपेन्को, मथियास ब्लुबाऊम वि. वे यी, आर. प्रज्ञानंद वि. अनिश गिरी, फॅबियानो कारुआना वि. हिकारू नाकामुरा
- **(महिला) :** दिव्या देशमुख वि. ॲना मुझिचुक, आर. वैशाली वि. बिबिसारा असाउबायेवा, अलेक्सांड्रा गोर्याचकिना वि. कॅटरिना लायनो, झू जिनेर वि. टॅन झोंगयी.

## तेजस्विन शंकरची चमक

**नवी दिल्ली :** भारताच्या तेजस्विन शंकरने अमेरिकेतील टेक्सास येथे झालेल्या 'डेव्हिड नोबल रिलेज २०२६' ॲथलेटिक्स स्पर्धेत डेकॅथ्लॉन हंगामाची विजयी सुरुवात केली. त्याने ७९४७ गुणांच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह या स्पर्धेत विजेतेपद पटकावले.

या हंगामातील आपल्या पहिल्याच डेकॅथ्लॉन स्पर्धेत खेळताना वाऱ्याच्या वेगवान प्रवाहामुळे त्याला ८००० गुणांचा टप्पा गाठण्यापासून अवघ्या ५३ गुणांनी मागे रहावे लागले.

## 'आयपीएल' सामन्यात आज कोलकाता नाइट रायडर्सचे आव्हान

# मुंबईचे विजयी प्रारंभाचे ध्येय

**पीटीआय, मुंबई**

**सर्वच विभागात** भक्कम दिसणाऱ्या मुंबई इंडियन्ससमोर इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) सामन्यात आज, रविवारी कोलकाता नाइट रायडर्स संघाचे आव्हान असणार आहे. मुंबईचा प्रयत्न आपले सहावे जेतेपद मिळविण्याचे असेल. मुंबईने २०१३ ते २०२० दरम्यान पाच जेतेपद पटकावली आहेत. मात्र, गेली काही वर्षे त्यांना जेतेपदाने हुलकावणी दिली आहे.

दुसरीकडे, कोलकाता नाइट रायडर्स संघाला दुखापतींचा फटका बसला आहे. गेल्या वर्षी हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखालील मुंबईचा संघ 'क्वॉलिफायर-२'मध्ये पंजाब किंग्जकडून पराभूत झाल्यानंतर तिसऱ्या स्थानी राहिला होता. मात्र, यंदा मुंबईचा संघ चांगल्या तयारीसह मैदानात उतरत आहे. त्यातच घरच्या मैदानावर खेळत असल्याने त्यांचे पारडे जड दिसत आहे.

मुंबईसाठी योग्य संघ संयोजन करण्याची गरज आहे. मुंबईचा प्रयत्न सुरुवातीचे काही सामने जिंकण्याचा असेल. कारण, संघाला चांगली सुरुवात करण्यास अपयश येते. कोलकाताचे गोलंदाजी आक्रमक तुलनेने कमकुवत दिसत असल्याने या लढतीत सध्या तरी मुंबईचे पारडे जड दिसत आहे.

कोलकाता संघात चेन्नई सुपर किंग्जचे माजी खेळाडू रचिन रवींद्र व मथीश पथिराना यांचा समावेश आहे. सलामीला संघाकडे टिम सेफर्टचा पर्याय आहे. यासह लिलावात महागडा ठरलेला कॅमेरून ग्रीन व सुनील नरेनच्या रूपाने संघाकडे चांगले अष्टपैलू आहेत. मुंबईत सामना असल्याने कोलकाताचा कर्णधार अजिंक्य रहाणे आणि युवा अंगक्रिश रघुवंशी हेदेखील खेळताना दिसतील.

### कोलकाताला गोलंदाजांची चिंता

- लिलावावेळी कोलकाता संघ हा चांगला दिसत होता. मात्र, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निर्देशानंतर फ्रँचायझीने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझुर रहमानला करारमुक्त केले. तसेच, भारतीय वेगवान गोलंदाज आकाश दीप आणि हर्षित राणा दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर गेले.
- संघात बदली खेळाडू म्हणून ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत चमक दाखवणाऱ्या झिम्बाब्वेच्या ब्लेसिंग मुझारबानीला स्थान देण्यात आले.
- मात्र, त्याच्यावर चांगल्या कामगिरीचा दबाव असेल. त्यामुळे गोलंदाजी विभागाची जबाबदारी वरुण चक्रवर्तीवर असेल. चक्रवर्तीला भारतात झालेल्या विश्वचषक स्पर्धेत चमक दाखवता आली नव्हती.

### रोहित, सूर्यकुमार, बुमराकडे लक्ष...

- केवळ एकदिवसीय सामने खेळणाऱ्या रोहित शर्माकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. सध्या रोहित तंदुरुस्त दिसत असून त्याचा आक्रमक खेळ पाहण्यासाठी चाहते मैदानावर गर्दी करतील. मुंबईच्या संघात अनेक तारांकित खेळाडू आहेत.
- ट्वेन्टी-२० विश्वचषक विजेत्या संघातील कर्णधार सूर्यकुमार यादव, पंड्या, तिलक वर्मा आणि जसप्रीत बुमराचा समावेश आहे. मुंबईकडे चांगले परदेशी खेळाडूही आहेत. यामध्ये रायन रिकल्टन, शेरफेन रूदरफोर्ड, कॉर्बिन बॉश, न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर, विल जॅक्स आणि ट्रेंट बोल्टसारख्या खेळाडूंचा समावेश आहे.
- बुमरा आणि बोल्टची जोडी कोलकाताच्या फलंदाजांच्या अडचणी वाढवू शकतात. शार्दूल ठाकूर व दीपक चाहर यांच्या रूपाने चांगले अनुभवी भारतीय गोलंदाज संघाकडे आहेत.
- नमन धीर पुन्हा एकदा विजयवीराची भूमिका चांगल्या पद्धतीने पार पाडण्याचा प्रयत्न करेल. गेल्या हंगामात त्याने चमक दाखवली होती.



**मुंबई इंडियन्स :** हार्दिक पंड्या (कर्णधार), क्विंटन डीकॉक (यष्टिरक्षक), दानिश मालेवार, रॉबिन मिंज (यष्टिरक्षक), रायन रिकल्टन (यष्टिरक्षक), शेरफेन रुदरफोर्ड, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, अथर्व अंकोलेकर, राज बावा, कॉर्बिन बॉश, विल जॅक्स, मयांक रावत, नमन धीर, मिचेल सँटनर, शार्दूल ठाकूर, तिलक वर्मा, अश्विनी कुमार, ट्रेंट बोल्ट, जसप्रीत बुमरा, दीपक चाहर, एएम गजनफर, मयांक मार्कंडे, मोहम्मद इजहार, रघु शर्मा.

**कोलकाता नाइट राइडर्स :** अजिंक्य रहाणे (कर्णधार), रिंकू सिंह (उपकर्णधार), फिन ॲलन, तेजस्वी दहिया (यष्टिरक्षक), मनीष पांडे, रोव्हमन पॉवेल, अंगक्रिश रघुवंशी, रमनदीप सिंग, सार्थक रंजन, टिम सेफर्ट (यष्टिरक्षक), राहुल त्रिपाठी, दक्ष कामरा, कॅमेरून ग्रीन, सुनील नरेन, रचिन रवींद्र, अनुकूल रॉय, वैभव अरोरा, सौरभ दुबे, कार्तिक त्यागी, ब्लेसिंग मुझारबानी, मथीश पथिराना, नवदीप सैनी, प्रशांत सोलंकी, उमरान मलिक, वरुण चक्रवर्ती.

▮ वेळ : सायंकाळी ७.३० वाजता ▮ थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, २; जिओहॉटस्टार ॲप.

## धोनी 'आयपीएल'च्या पहिल्या दोन आठवड्यांना मुकणार



**नवी दिल्ली :** चेन्नई सुपर किंग्जचा प्रमुख खेळाडू महेंद्रसिंह धोनी पायाचे स्नायू दुखावल्यामुळे 'आयपीएल'च्या पहिल्या दोन आठवड्यांत खेळू शकणार नाही. चेन्नई फ्रँचायझीनेच शनिवारी ही माहिती दिली. मात्र, धोनी संघासाठी कधी उपलब्ध होईल याविषयी कुठलाही तपशील फ्रँचायझीने दिलेला नाही.

धोनी सध्या पायाच्या स्नायूंच्या ताणावरील उपचार करत आहे. परिणामी, तो 'आयपीएल'च्या नव्या हंगामात पहिल्या दोन आठवड्यांना मुकण्याची शक्यता आहे, असे फ्रँचायझीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून २०२० मध्ये निवृत्ती घेतल्यापासून धोनी केवळ 'आयपीएल' खेळत आहे. वाढत्या वयामुळे धोनीच्या 'आयपीएल'मधील भविष्याबाबत प्रत्येक हंगामानंतर जोरदार चर्चा होत असते. धोनी आता फक्त 'आयपीएल' खेळत असल्याने, सामन्यासाठी लागणारी तंदुरुस्ती टिकवून ठेवणे त्याच्यासाठी कठीण होत आहे.

ऋतुराज गायकवाड संघाचा अधिकृत कर्णधार असला, तरी धोनीच या फ्रँचायझीचा खरा मार्गदर्शक आणि प्रमुख खेळाडू राहिला आहे. फ्रँचायझीच्या निलंबनाचा कालावधी वगळता २००८ पासून धोनी या संघाचा तारणहार ठरला आहे. अखेरच्या 'आयपीएल'मध्ये धोनीने १४ सामने खेळले होते. डावाच्या अखेरीस फटकेबाजी करण्यासाठी तो खालच्या क्रमांकावर फलंदाजीला येत असे. आंतरराष्ट्रीय निवृत्तीनंतर त्याला गुडघ्याच्या त्रासाचाही सामना करावा लागला असून २०२३ मध्ये त्याच्यावर शस्त्रक्रियाही झाली होती.

# बंगळूरुची दमदार सलामी

## सनरायजर्स हैदराबाद संघावर सहा गडी राखून मात; कोहली, पडिक्कलची चमक



**वृत्तसंस्था, बंगळूरु**

**विराट कोहली** (३८ चेंडूंत नाबाद ६९) आणि देवदत्त पडिक्कल (२६ चेंडूत ६१) यांच्या तडाखेबंद फलंदाजीच्या जोरावर 'आयपीएल'च्या नव्या हंगामाला गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने विजयी सलामी दिली. चिन्नास्वामी मैदानावर शनिवारी झालेल्या सामन्यात त्यांनी सनरायजर्स हैदराबाद संघाचा २६ चेंडू आणि सहा गडी राखून पराभव केला.

प्रथम फलंदाजी करताना ट्रॅव्हिस हेड, अभिषेक शर्मा या आक्रमक सलामीच्या जोडीला अपयश आल्यानंतरही सनरायजर्सने २० षटकांत ९ बाद २०१ धावांची मजल मारली. कर्णधार इशान किशनने आपली लय कायम राखताना ३८ चेंडंत आठ चौकार, पाच षटकारांसह ८० धावांची खेळी केली. त्याला अनिकेत वर्माच्या १८ चेंडूंतील वेगवान ४३ धावांच्या खेळीची पूरक साथ मिळाली. त्यापूर्वी, जेकब डफीने आपल्या सलग चार षटकांच्या गोलंदाजीत २२ धावांत तीन गडी बाद करताना हैदराबादला ३ बाद २९ असे अडचणीत आणले होते.

आव्हानाचा पाठलाग करताना विराट कोहली आणि पडिक्कल यांच्यात दुसऱ्या गड्यासाठी झालेल्या १०१ धावांच्या भागीदारीमुळे बंगळूरुने १५.४ षटकांतच ४ बाद २०३ धावा केल्या. कोहलीने प्रत्येकी पाच चौकार आणि षटकार मारले. पडिक्कलने सात चौकार आणि चार षटकारांसह आपली खेळी सजवली. कर्णधार रजत पाटीदारनेही १२ चेंडूंत ३१ धावांचे योगदान दिले.

### संक्षिप्त धावफलक

**सनरायजर्स हैदराबाद :** २० षटकांत ९ बाद २०१ (इशान किशन ८०, अनिकेत वर्मा ४३; जेकब डफी ३/२२, रोमारियो शेफर्ड ३/५४) **पराभूत वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु :** १५.४ षटकांत ४ बाद २०३ (विराट कोहली नाबाद ६९, देवदत पडिक्कल ६१, रजत पाटीदार ३१; डेव्हिड पेन २/३५)





## असेट्स केअर & रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.

ACRE MAKING ASSETS WORK

नोंदणीकृत कार्यालयः चौदावा मजला, एरॉस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली -110019. टेली.: 91-11-43115600 फॅक्स: 91-11-43115618
कॉर्पोरेट कार्यालयः युनिट क्र. 502, सी विंग, वन बीकेसी, रेडीयस डेव्हलपर्स, प्लॉट क्र. सी 66, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - 400 051
टेली.: 022 68643101 ई-मेल: acre.arc@acreindia.in वेबसाईट: www.acreindia.in CIN: U65993DL2002PLC115769

### जोडपत्र IV-ए - अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) व नियम 9(1) च्या तरतुदीसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व जामीनदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की असेट्स केअर & रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लि. [CIN: U65993DL2002PLC115769] ("सुरक्षित धनको") कडे तारण / भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारयांनी प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून त्यांची पुढील कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांचेकडून घेणे असलेल्या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी सदर मालमत्तेची "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर विक्री करण्यात येईल. प्रत्येक मालमत्तेसाठी आरक्षित किंमत व बयाणा रक्कम नमूद करण्यात आलेली आहे.

**अनामत मत्तेचे तपशील**

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. आणि एसीआरई ट्रस्टचे नाव | कर्जदार / सह-कर्जदार/गहाणकार / जामीनदाराचे नाव | एकूण थकबाकी | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम | बयाणा रकमेच्या भरण्यासाठी बँक खात्याचे तपशील | लिलाव दिनांक आणि वेळ | बयाणा रक्कम जमा करण्याचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 406DHH80405 691 / H406FHL0829 838 ACRE 178 TRUST | अनंत महादेवराव खर्डे (कर्जदार) विभा अनंत खर्डे (सह-कर्जदार) | 28.03.2026 रोजी रु. 4900115.62/- (रुपये एकोणचाळीस लक्ष एकशे पंधरा आणि बासष्ट पैसे फक्त) यासह भरणा करण्याच्या व वसुली करण्याच्या दिनांकापर्यंतचे लागू असलेले व्याज, अधिभार व शुल्के. | रु. 30,00,000/- (रुपये तीस लक्ष फक्त) | रु. 3,00,000/- (रुपये तीन लक्ष फक्त) | खाते क्रमांकः ACRE-178-ट्रस्ट खाते क्रमांकः 0901102000042617 बँकः आयडीबीआय बँक आयएफएससी कोडः IBKL0000901 | 29 एप्रिल 2026 रोजी दु. 2.30 ते 3.30 वाजेपर्यंत | 28 एप्रिल 2026 रोजी 4:00 वाजेपर्यंत |

**अनामत मत्तेचे वर्णनः** जमीन प्लॉट क्र. 203, क्षेत्रफळ सुमारे 220.68 चौ.मी. (2375.00 चौ.फू.), जमीन ख.क्र. 63 10 69 आणि 71 चा भाग, मौजा परसोडी, सिटी सर्वे क्र. 1129/203, शीट क्र. 194/23, नामपा आणि नासुप्र च्या हद्दीत, तहसील आणि जिल्हा नागपूर. चतुःसीमाः पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस - प्लॉट क्र. 202, उत्तरेस- रस्ता, दक्षिणेस - खसरयाची हद्द.

| | | |
|---|---|---|
| 1. | बयाणा रकमेचा भरणा वर नमूद करण्यात आलेल्या बँक खात्यामध्ये डिमांड ड्राफ्ट / आरटीजीएस / एनईएफटी च्या माध्यमातून करण्यात यावा. | |
| 2. | लिलावासाठी वेबसाईट | www.bankeauctions.com |
| 3. | संपर्क तपशील | रोहन सावंतः 9833143013 / अक्षय हसीजा-8080239611 |
| 4. | मालमत्तेची पाहणी केवळ आधी वेळ घेऊनच करता येईल. | |
| 5. | विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया वेबसाईटला भेट द्यावी www.acreindia.in / www.bankeauctions.com | |

दिनांकः 29.03.2026
स्थानः नागपूर

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी
असेट्स केअर & रिकंस्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.

## इंडिया एसएमई ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कं. लिमिटेड

isarc

नोंदणीकृत कार्यालयः द रूबी, 11वा मजला, उत्तर- पश्चिम विभाग, प्लॉट नं 29, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई -400028.

### ताबा सूचना (सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8(2) यानुसार)

खाली नमूद केलेल्या कर्जदारांनी/सह-कर्जदारांनी/जामीनदारांनी/गहाण ठेवणारे यांनी फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड ("मूळकर्जदाता") यांच्याकडून आर्थिक सहाय्य/कर्ज घेतले होते. सदर कर्ज, त्यातील सर्व अंतर्निहित तारण हितसंबंध आणि मूळ कर्जदात्याचे सर्व हक्क, मालकी आणि हितसंबंधांसह, मूळ कर्जदात्याद्वारे सरफेसी कायदा, 2002 च्या तरतुदींनुसार, हस्तांतरण करारनामा दिनांकित 26 सप्टेंबर 2025 याद्वारे, आयएसएआरसी-2025-2026-3 ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेल्या इंडिया एसएमई ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड ("आयएसएआरसी") च्या नावे हस्तांतरित करण्यात आले.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हा इंडिया एसएमई ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड ("आयएसएआरसी") चा अधिकृत अधिकारी असून त्याने सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,2002 अंतर्गत आणि नियम 3 सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स 2002 च्या कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारे यांना, सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम परत करण्यासाठी मागणी नोटीस बजावली आहे.

कर्जदार/सह-कर्जदार रक्कम परतफेड करण्यास अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 8 सहवाचता निर्देशित कायद्यांच्या कलम 13 च्या उप-कलम (4) अंतर्गत, त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या तारखांना, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

कर्जदार/सह-कर्जदारांना, विशेषतः, आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार इंडिया एसएमई ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड ("आयएसएआरसी") यांच्या शुल्क आकारणीच्या विषयाधीन असेल.

कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेववणारे यांचे लक्ष, गहाण ठेवलेल्या मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेसंदर्भात, निर्देशित कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदीकडे वेधले जात आहे.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. / कर्जदाराचे / सह-कर्जदाराचे नाव | मागणी सूचनांची तारीख | ताब्याची तारीख / ताब्याची स्थिती | मागणी सूचनेतील रक्कम (रु.) | मागणी सूचनेतील रक्कम (रु.) मालमत्तांचे वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एफइडीवायएव्हीएसटीएल0527416 मयूर संजयराव डहाके/ ममता हंसराज शर्मा / छाया संजयराव डहाके/ संजय मारोतराव डहाके | 28-10-2025 | 26-03-2026 प्रतिकात्मक ताबा | रु. 11,28,704.11 (रुपये अकरा लाख अठ्ठावीस हजार सातशे चार आणि अकरा पैसे फक्त) | स्थावर मालमत्ता लेआउट प्लॉट क्र. 42/2, क्षेत्रफळ मोजमापे 500.00 चौ.फूट (म्हणजे 46.46 चौ.मीटर), आणि त्यावर बांधलेले घर बिल्ट अप क्षेत्रफळ 450.84 चौ.फूट (म्हणजे 41.90 चौ.मीटर), येथे स्थित भोस, ता. जि. यशतमाळ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.पूर्व- 10 मीटर लेआउट रस्ता आणि नंतर मोकळी जागा, पश्चिम- प्लॉट क्र. 41, उत्तर- 20 फूट लेआउट रस्ता, दक्षिण- प्लॉट क्र. 42 |
| 2 | एफइडीवायएव्ही0एचएल0524202 श्रीराम येंकफल्ली राऊत आणि सपना श्रीराम राऊत | 28-10-2025 | 26-03-2026 प्रतिकात्मक ताबा | रु. 6,74,839.16 (रुपये सहा लाख चौरयाहत्तर हजार आठशे एकोणचाळीस आणि सोळा पैसे फक्त) | गावठाण मालमत्ता क्र. 435, क्षेत्रफळ मोजमापे 1890.00 चौ.फूट, आणि त्यावर बांधलेल्या घराचे बिल्ट अप क्षेत्रफळ 840.00 चौ.फूट, येथे स्थित पालस्कुंड, ता. राळेगाव जि. यवतमाळ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल. पूर्व- विनायक पवार यांचे घर, पश्चिम- रस्ता, उत्तर- रामचंद्र पवार यांचे घर, दक्षिण-रस्ता. |
| 3 | एफइडीएएमएएसटीएल0540718 राष्ट्रपाल मनोहरराव मेश्राम / मनोहर गोमाजी मेश्राम / वर्षा राष्ट्रपाल मेश्राम | 28-10-2025 | 26-03-2026 प्रतिकात्मक ताबा | रु. 8,49,231.33 (रुपये आठ लाख एकोणपन्नास हजार दोनशे एकतीस आणि तेहतीस पैसे फक्त) | फ्लॅट/अपार्टमेंट क्षेत्रफळ सुमारे मोजमापे 900 चौ.फूट/ चौ.मीटर (बिल्ट अप क्षेत्र/कार्पेट एरिया) क्र. 1953 चांदूर रेल्वे नावाने ओळखल्या जाणारया इमारतीच्या तळमजल्यावर, सहकारी गृहनिर्माण/अपार्टमेंट मालक संघटनेत बांधलेले/मानले जाईल आणि त्यावरील सर्व फिक्स्चर, फिटिंग्जसह, आणि खालील जमिनीतील अविभाजित हितसंबंध येथे स्थित चांदूर रेल्वे, नोंदणी जिल्हा अमरावती, उप-जिल्हा चांदूर रेल्वे, आणि सर्व्हे क्र. असून, ह्या जमिनीची सीमा खालीलप्रमाणे आहेः पूर्व- रस्ता, पश्चिम- श्री मनोहर मेश्राम यांची इतर मालमत्ता, उत्तर- श्री विजय बाकर यांचे घर, दक्षिण- श्री दुर्गादास खोद्रदादे यांचे घर. |
| 4 | एफइडीएएमएएसटीएल0506301 राहुल श्रीधरराव यादव आणि कलावती श्रीधरराव यादव | 28-10-2025 | 26-03-2026 प्रतिकात्मक ताबा | रु. 20,85,856.37 (रुपये वीस लाख पंच्याऐंशी हजार आठशे छप्पन्न आणि सदतीस पैसे फक्त) | जुनी मालमत्ता क्र. 1119, नवीन मालमत्ता क्र. 1378 एकूण क्षेत्रफळ मोजमापे 720 चौ. फूट वॉर्ड क्र. 2 आणि त्यावर बांधलेले घर, येथे स्थित मौजे- चांदूर रेल्वे, ता. चांदूर रेल्वे. जि. अमरावती, नगर परिषद, चांदूर रेल्वे. हद्दीमधील यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, पूर्व- रस्ता, पश्चिम- रस्ता, उत्तर- प्रभाकर गायकवाड यांचे घर, दक्षिण- श्री. बाबर यांचे घर. |

दिनांकः 29.03.2026 / ठिकाणः महाराष्ट्र

अधिकृत अधिकारी, इंडिया एसएमई ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड


हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ & २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक -२२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई- ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी- ०२०-६७२४१०००, फॅक्स- ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R Loksatta, RNI. No. MAHMAR/2006/18851.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

# असंतुलित आहारामुळे 'इस्केमिक' हृदयरोग

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** इस्केमिक हृदयरोगामुळे जगभरात २०२३ मध्ये ४० लाखांहून अधिक मृत्यू झाल्याचे एका अभ्यासातून समोर आले आहे.

हृदयातील रक्तप्रवाह कमी होणे आणि हृदयाच्या स्नायूंना पुरेसे रक्त न मिळाल्यामुळे हा रोग होतो. अशा मृत्यूंसाठी असंतुलित आहार जसे, धान्यांचे प्रमाण कमी असलेला किंवा सोडियमचे जास्त प्रमाण असलेला आहार कारणीभूत ठरू शकतो, असे संशोधकांचे मत आहे.

अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स जनरल हॉस्पिटल आणि दक्षिण कोरियातील क्युंग ही युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज स्टडी (२०२३)' मधील विदाचे विश्लेषण केले, त्यावरून हे निष्कर्ष काढले आहेत. हे निष्कर्ष 'नेचर मेडिसिन' या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत.

संशोधन पथकाला असे आढळून आले की, १९९० च्या तुलनेत २०२३ मध्ये आहाराशी संबंधित इस्केमिक हृदयरोगामुळे होणाऱ्या जागतिक मृत्यूंच्या संख्येत ४१.५९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आहाराशी संबंधित घटकांमध्ये, सुकामेवा आणि बियांचे कमी सेवन (प्रति एक लाख लोकसंख्येमागे ९.८७ मृत्यू), संपूर्ण धान्यांचे कमी सेवन (९.२२), फळांचे कमी सेवन (७.२५), आणि सोडियमचे जास्त सेवन (७.१५) ही इस्केमिक हृदयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूंची मुख्य कारणे होती. काही देशांमध्ये प्रक्रिया केलेले मांस आणि साखरयुक्त पेये यांसारख्या संभाव्य हानीकारक पदार्थांच्या अतिसेवनामुळे हा आजार अधिक प्रमाणात आढळला. ४५ वर्षे आणि त्यापेक्षा कमी वयाच्या लोकांपेक्षा ६५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांमध्ये मृत्युदर जास्त होता, असेही आढळून आले.




# लोकसहभागातून निरोगी महाराष्ट्र घडवा - आबिटकर

## 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' विभागीय कार्यशाळा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**नागपूर :** आरोग्य सेवा गावपातळीपर्यंत अधिक भक्कम करण्यावर भर देत सर्वसामान्यांसाठीच्या योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकसहभागाची चळवळ उभी राहणे गरजेचे असून आरोग्य यंत्रणा आणि नागरिकांच्या संयुक्त प्रयत्नांतून सशक्त व निरोगी महाराष्ट्र घडवूया, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी गुरुवारी येथे केले.

आरोग्य विभागातर्फे 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाअंतर्गत जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नागपुरातील एम्स रुग्णालयातील सभागृहात विभागीय कार्यशाळेचे उद्घाटन करताना आबिटकर बोलत होते. उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपायांवर भर, ग्रामीण भागातील नागरिकांच्या सामूहिक वर्तणुकीत बदल घडवणे आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे यावर या उपक्रमात विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. अभियानात स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा व तालुका प्रशासन, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेवक, सेविका, आशा कार्यकर्त्या आणि ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा ठरणार असल्याचे आबिटकर म्हणाले.

एकात्मिक कार्यपद्धती व पारदर्शक मूल्यमापनाच्या आधारे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना 'आरोग्यसंपन्न ग्राम' म्हणून मानांकन देऊन प्रोत्साहनपर पुरस्कारही दिले जाणार आहे. याप्रसंगी राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, नागपूर व गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुक्रमे विनायक महामुनी आणि मुरुगनाथम एम. यांनीही आपले मत मांडले. यावेळी सचिव (२) ई. रविंद्रन, राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या आयुक्त व आरोग्य सेवा संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कांदेवाड आदी उपस्थित होते.

# 'विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण' राष्ट्रीय परिषद उद्यापासून

**नागपूर :** 'एनईपी २०२० च्या संदर्भात विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण' या विषयावर आधारित 'महाराष्ट्र ज्ञान सभा' आयोजित करण्यात आली आहे. राज्यातील शैक्षणिक उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते, शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गजांना एकाच व्यासपीठावर आणून विचारमंथन करणे हा या सभेचा मुख्य उद्देश असल्याची माहिती, शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी यांनी पत्रकार परिषदेत दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवार ४ एप्रिलला सकाळी १० वाजता व्हीएनआयटीच्या सभागृहात या परिषदेचे उद्घाटन होणार आहे.

'विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण' ही संकल्पना विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय ध्येयाशी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' च्या परिवर्तनीय दृष्टिकोनाशी निगडित आहे. प्रबुद्ध, कुशल आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध समाज घडवण्यासाठी शिक्षणाची भूमिका या विषयावरील ही परिषद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, विश्वेश्वरैया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था आणि भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे.

दोन दिवस चालणारी ही राष्ट्रीय परिषद शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, नवी दिल्ली यांचा एक उपक्रम आहे. या परिषदेसाठी देशभरातील ५०० पेक्षा अधिक प्रतिनिधी येणार आहेत. उद्घाटन सत्राला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर उपस्थित राहणार आहेत. तर रविवार ५ एप्रिलला सायंकाळी ५ वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होणार आहे. पत्रकार परिषदेला कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, व्हीएनआयटीचे संचालक प्रेमलाल पटेल यांची उपस्थिती होती.

# ग्रामीण भागात डिझेल तुटवडा; ट्रान्सपोर्टर त्रस्त

## काळाबाजार होत असल्याचा आरोप

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** ग्रामीण भागात एका बाजूला वाहतूकदारांना डिझेल मिळत नसल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे, तर दुसऱ्या बाजूला काही पेट्रोल पंपांवर डिझेलचा काळाबाजार सुरू असल्याचे गंभीर आरोप वाहतूक व्यावसायिकांनी केले आहेत.

ग्रामीण भागातील काही पेट्रोल पंपांवर ट्रकचालकांना डिझेल उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते, मात्र त्याच वेळी जादा दराने डिझेल टँकरद्वारे इतर शहरांकडे पाठवले जात असल्याचा आरोप वाहतूकदारांनी केला. काही वाहतूकदार म्हणाले, नागपूर जिल्ह्यातील काही पंपांवर ट्रकांना डिझेल देण्यास नकार दिला जातो. त्याच पंपांवरून दररोज मोठ्या टँकरद्वारे डिझेल भरून बाहेर पाठवले जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. यासंदर्भातील छायाचित्रे बैठकीत सादर केली गेली. वाहतूकदारांच्या बैठकीत संबंधित पेट्रोल पंप चालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी सर्वानुमते केली गेली.

कुकू मारवा म्हणाले, ट्रक व बस यांना प्राधान्याने डिझेल मिळणे आवश्यक आहे. ट्रकांना डिझेल न मिळाल्यास त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर होणार आहे. या परिस्थितीची माहिती राज्याच्या परिवहन मंत्र्यांना देण्यात येणार आहे. नागपूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून संबंधित पंपांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जाणार असल्याचेही मारवा म्हणाले. या बैठकीस नागपूर ट्रकर्स संघटनेचे उपाध्यक्ष गुरदयाल सिंग पड्डा, निशान सिंग घोत्रा, राजेंद्र सिंग, प्रीतम सिंग, बाबा डावरे, महेंद्र लुळे, बॉबी सैनी, पप्पू गुप्ता, करनैल सिंग, जसविंदर सिंग, रोशन खडसे आदी उपस्थित होते.

# 'निसर्ग रंग' चित्रप्रदर्शनाचे उत्साहात उद्घाटन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**नागपूर :** शहरातील अलग एंगल कम्युनिटी आर्ट सेंटर, हजारी पहाड येथे २ एप्रिलला सायंकाळी सहा वाजता 'निसर्ग रंग' या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. हे प्रदर्शन कलाकार प्रफुल्ल खांडलकर यांच्या कलाकृतींवर आधारित असून, कला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

याप्रसंगी मिली विकमशी यांनी कलाकाराच्या कलाकृतींबाबत बोलताना त्यांच्या ऑईल पेंटिंगमध्ये दिसणारे पाश्चात्त्य प्रभाव, तसेच तीनही माध्यमांमध्ये त्यांनी साधलेली सफाई आणि कौशल्य याबद्दल सविस्तर मांडणी केली. त्यांच्या मते, कलाकाराची शैली निसर्गाशी जोडलेली असून, त्यात आधुनिकतेचा सुंदर संगम दिसून येतो.

उद्घाटक सुधाकर अजबे यांनी कलाकाराच्या विविध माध्यमांवरील पकडीचे कौतुक करताना सांगितले, त्यांच्या कामात प्रत्येक माध्यमावर समान प्रभुत्व दिसते. त्यांनी आपल्या बालपणीच्या कलानुभवांची आठवण करून देत, पंधें गुरुजी यांच्यासोबतच्या कार्याचा उल्लेखही केला.

लोकसत्ता विदर्भ आवृत्तीचे निवासी संपादक देवेंद्र गावंडे यांनी अलग एंगलच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. कलाकारांसाठी मोफत गॅलरी उपलब्ध करून देणे हे अत्यंत दुर्मिळ आणि प्रेरणादायी कार्य असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, कला जिवंत ठेवण्यासाठी लोकांनी कलाकृती खरेदी करून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे आणि कला विषयावर नियमित संवाद घडत राहणे गरजेचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यक्रमाला कलाकार बबन बेसेकर, शिल्पकार हिराचंद विकमशी, इज़राल शेख़, अनिल कुमारे, ज्ञानचंद उईके, उषा ढाकुलकर, हिरा बावनकर, श्रीमती पुष्पा अजबे, अभिषेक चौरसिया यांची उपस्थिती लाभली. हे प्रदर्शन १ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान दररोज दुपारी चार ते सायंकाळी सात या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

ACRE MAKING ASSETS WORK

## ॲसेटस केअर अँड रिकंस्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.

युनिट क्र. 502, वन बीकेसी, रॅडीयस डेवलपमेंट, प्लॉट क्र. सी 66, जी ब्लॉक, वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई : 400051

**शुद्धिपत्रक**

स्थावर मालमत्तांसाठी विक्री सूचनेकरीता दि संडे एक्स्प्रेस आणि लोकसत्ता (नागपूर आवृत्ती) 29.03.2026 रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्र प्रसिद्धीचे शुद्धिपत्रक. सामान्य जनतेला ह्याद्वारे मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे असल्याचे कळविण्यात येत आहे :

मौजे परसोडी, एनएमसी आणि एनआयटी हद्दीमध्ये, तालुका आणि जिल्हा नागपूर, महाराष्ट्र राज्यामध्ये वसलेल्या प्लॉट क्र. 203, मोजमाप 220.68 चौरस मीटर्स (म्हणजेच 2375.00 चौरस फूट) क्षेत्रफळ असलेल्या जमिनीचा धारण केलेला खसरा क्र. 63, 69 आणि 71, सिटी सर्वेशी सुसंगत क्र. 1129/203, शीट क्र. 194/23 चा सर्व खंड आणि भूखंडावर बांधण्यात आलेल्या ''स्मित रेसिडन्सी'' म्हणून ज्ञात इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील मालमत्तेचा असलेला अपार्टमेंट क्र. 401 चा सर्व खंड आणि भूखंड सह इमारतीच्या खालील जमिनीचा प्रमाणामध्ये असलेल्या अविभाजित हिस्सा आणि सर्व अधिकार, सुविधाधिकार आणि त्यामध्ये असलेले सर्व हक्क आणि सीमा पुढील प्रमाणेः पूर्वसः रोड, पश्चिमेसः प्लॉट क्र. 202, उत्तरेसः रोड, आणि दक्षिणेसः खसरा सीमा.

सर्व अन्य अटी आणि शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील.

दिनांकः 03.04.2026 — सही/- प्राधिकृत अधिकारी
ठिकाणः नागपूर — ॲसेटस केअर अँड रिकंस्ट्रक्शन एन्टरप्राईज लि.

महाप्रित

## महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित

(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**स्वारस्य अभिव्यक्तीची सूचना (EOI) मुंबई महानगर प्रदेश (MMR) मध्ये MAHAPREIT मार्फत जागेच्या विकासासाठी जागतिक दर्जाच्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी विकासकांच्या पॅनेल निर्मितीबाबत.**

महाप्रित मुंबई महानगर प्रदेश (MMR) मध्ये शाश्वत व जागतिक दर्जाच्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या विकासासाठी (यापुढे ''प्रकल्प'' असा उल्लेख) प्रतिष्ठित अर्जदार, म्हणजेच जमीनमालक/मालकांकडून अभिरुची दर्शविण्याची विनंती (EOI) आमंत्रित करीत आहे.

इच्छुक जमीनमालकांनी आपले प्रस्ताव दिनांक **३१/०३/२०२७ रोजी दुपारी ०३:०० वाजेपर्यंत** सादर करावेत. अधिक माहितीसाठी कृपया **https://mahapreit.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी.

व्यवस्थापकीय संचालक, महाप्रित

महाप्रित

## महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित

(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**महाप्रित कंपनीमध्ये विविध संवर्गातील पदे करारतत्वावर भरण्याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीला मुदतवाढ देण्याबाबत**

महाप्रित कंपनीसाठी करारतत्वावर पदे भरण्याकरिता लोकसत्ता व इंडीयन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात तसेच महाप्रितच्या संकेतस्थळावर तपशीलवार जाहिरात दि. १३/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार अर्जदारांकडून अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दि.३१/०३/२०२६ होती.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | मुख्य महाव्यवस्थापक (Corporate Affairs) | ०१ |
| २ | उपमहाव्यवस्थापक (वित्त व लेखा) | ०१ |
| ३ | सहाय्यक कंपनी सचिव | ०१ |
| ४ | व्यवस्थापक (ESG-Business Development) | ०१ |
| ५ | लेखा सहाय्यक | ०२ |
| | पुणे कार्यालय | |
| ६ | उपअभियंता (RE Cum IT), पुणे कार्यालय | ०१ |
| ७ | व्यवस्थापक (Renewable Energy/Project) | ०१ |
| ८ | सहाय्यक अभियंता ((RE), पुणे कार्यालय | ०१ |

वरीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्यासाठी **दि.१५/०४/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.** तरी इच्छुक उमेदवारांनी **https://forms.gle/gDpaDNCadLdbXvoU9** या लिंकवर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. **अर्ज करण्याची शेवटची मुदत दि. १५/०४/२०२६ संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील.** ऑनलाईन अर्ज सादर करण्यास तांत्रिक अडचण असल्यास **dgm.admin@mahapreit.in** या ई-मेलवर अर्ज सादर करावेत. तसेच सदर जाहिरातीच्या अटी व शर्ती, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता व अनुभव यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही. अधिक माहितीकरिता कृपया **https://mahapreit.in** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

कार्यकारी संचालक (प्रशासन) महाप्रित

बँक ऑफ़ इंडिया
नातं बँकिंग पलिकडचं

नागपुर अंचल : चौथा माळा बँक ऑफ इंडिया इमारत एस.व्ही. पटेल मार्ग किंग्सवे नागपुर
फोन : 0712-2557596

## सोने तारण कर्ज परत मागवण्याची सूचना

ज्या अनुषंगाने, खाली सही करणारे **बँक ऑफ इंडिया दावलामाटी शाखेचे शाखा** व्यवस्थापक, बँकेच्या वसुली धोरणानुसार कार्यरत असून, संबंधित कर्जदार/जामीनदार यांना संबंधित नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम संबंधित नोटीसच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या आत** अदा करण्याबाबत सूचित करण्यात आले होते, याचे तपशील खाली नमूद आहेत.

**परंतु विविध कारणांमुळे सदर नोटीसा संबंधित कर्जदारांच्या पत्त्यावर बजावता आल्या नाहीत. सदर नोटींच्या प्रती खाली सही करणाऱ्यांकडे उपलब्ध असून, संबंधित कर्जदार/जामीनदार यांनी इच्छित असल्यास कोणत्याही कामकाजाच्या दिवशी नियमित कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांकडून त्या प्राप्त करून घ्याव्यात.**

तथापि, यान्वये संबंधित कर्जदारांना सूचना देण्यात येते की, त्यांनी या जाहीर नोटीच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या आत,** खाली नमूद केल्याप्रमाणे देय असलेली रक्कम तसेच संबंधित कर्ज व इतर करारपत्रे व दस्तऐवजांनुसार ठरविलेल्या करारनिहाय व्याजदराने, देय तारखेपासून प्रत्यक्ष अदा करण्याच्या दिनांकापर्यंतचे पुढील व्याजासह, **बँक ऑफ इंडिया, दावलामाटी शाखेकडे** अदा करावी.

सदर कर्ज करार व संबंधित दस्तऐवजांनुसार कर्जदारांच्या जबाबदाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी खाली नमूद मालमत्ता/मालमत्तांचा तारण म्हणून बँक ऑफ इंडिया, **दावलामाटी शाखेकडे** गहाण ठेवण्यात आलेली आहे.

| अनु क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता आणि शाखा | सोने कर्जाचे वर्णन | मांगीतलेली रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | कु./सौ. प्रतिभा विवेक बुंदेले पत्ताः एल.आई.जी 39, म्हाडा कॉलनी, दवलामाटी, हनुमान मंदिराजवळ, 8वा मैल, **दावलामाटी शाखा** | 09.12.2024 रोजी 60,000/- रुपयांचे सोने तारण कर्ज मंजूर झाले. | रु. 67,495.70 तसेच दिनांक 10.03.2026 च्या रिकॉल नोटिसनुसार व्याज व इतर शुल्क. |

जर संबंधित कर्जदारांनी वर सांगितल्याप्रमाणे बँकेला पैसे देण्यास अपयशी ठरले, तर बँक वरील सुरक्षित मालमत्तेवर वसुली धोरण आणि लागू नियमांनुसार कारवाई करेल आणि संबंधित कर्जदाराच्या खर्चाच्या आणि परिणामांच्या जोखमीवर कारवाई करेल.

दिनांक : 02.04.2026 — सहि/- शाखा व्यवस्थापक

लोकसत्ता क्लासिफाइडस्
सगळ्यांकरिता सर्वकाही

Satish Misal Educational Foundation's BRICK SCHOOL OF ARCHITECTURE

SMEF's Brick School of Architecture, S. No. 50/3, Jagdamba Bhawan Marg, Undri, Pune - 411060

Applications are invited from candidates for the following posts:

Branch/Course: B.Arch

| Post | Open | SC | ST | VJDT | NT-B | NT-C | OBC | SEBC | EWS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Professor | 1 | 1 | | | | | | | |
| Associate Professor | 1 | 1 | | 1 | | | 1 | 1 | |
| Assistant Professor | | 2(1F) | 1 | 1 | 1 | 1 | 2(1F) | 2(1F) | 1 |

Branch/Course: M.Arch (Design & Project Management)

| | | |
|---|---|---|
| Professor (1 Post): Open to All | Associate Professor (1 Post): Open to All | Assistant Professor (1 Post): Open to All |

Note: Qualifications for the above posts are as prescribed by Savitribai Phule Pune University and Council of Architecture (2020 Norms) for UG and Council of Architecture (2022 Norms) for PG. Applications along with necessary documents should reach the office within 30 days from the date of publication of this advertisement.

Website: www.brick.edu.in | Email: info@brick.edu.in
Tel: +91 8380886066/+91 7276042700

यात्रा विशेष

यात्रासहल

**दोस्ती टूर- चारधामयात्रा, आदिकैलाश- ओमपर्वत, नेपाळ, गंगासागर- पुरी- आसाम अरुणाचल- मेघालय, सिमला- मनाली, काश्मीर- ट्युलिपसह, अमरनाथयात्रा, सिक्कीम- दार्जिलिंग, भूतान, 9594880123/ 9702251584.**

0070987728-13

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सुचीत करणेत येते की, एम/एस गोल्डन मेगास्ट्रक्चर्स एलएलपी, गट क्रमांक १४५/बी, पी.एच. क्रमांक ३८, सीटीएस क्रमांक ६४०, शीट क्रमांक ३०, मौजा पिपळा, तालुका नागपूर (ग्रामीण), जिल्हा नागपूर, महाराष्ट्र येथील प्रस्तावित समूह निवासी बहुकुटुंबीय इमारत प्रकल्पाकरीता महाराष्ट्र शासन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या राज्यस्तरीय I D N O. पर्यावरण आघात मुल्यांकन समितीने EC EC26C3801MH5878733N दिनांक २४/०३/२०२६ व फाईल नं. SIA/MH/INFRA2/565720/2026 नुसार पर्यावरण विषयक परवानगी दिलेली आहे. सदर परवानगी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ नुसार देण्यात आलेली आहे.

सदर परवानगीच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे उपलब्ध असून http://parivesh.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Date 03.04.2026

एम/एस. गोल्डन मेगास्ट्रक्चर्स एलएलपी

